# शिकू आनंदे – एक यशस्वी वाटचाल

ॲड. किशोर लुल्ला

गुणवत्ता म्हणजे केवळ मार्कांची टक्केवारी असे नव्हे, तर जीवनकौशल्ये जे विकसित करते ते खरे शिक्षण. हे मुलांना सहजगत्या उपलब्ध व्हायला हवे यासाठी व सर्वकष सातत्यपूर्ण प्रयत्नाची गरज आहे, हे आपण जाणतोच. शिक्षण ही सतत बदलत जाणारी गोष्ट आहे. गुणवत्ता पूर्ण शिक्षणासाठी या बदलाला सामोरे जाणे हे तितकेच महत्वाचे आहे. या प्रक्रियेतील शिक्षक हा सर्वात महत्वाचा घटक आहे. त्याला दर्जेदार प्रशिक्षण देऊन विविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. शाळांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून या व्यवस्थेला बळ देणे व पालकांचे प्रबोधन करणे ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे

मागील काही वर्षात ‘मुल असते कसे’?, ‘मुल शिकते कसे’? शास्त्रीय बालशिक्षणाचे महत्व व गरज, मूल्यमापन पद्धती यासारख्या विविध विषयामध्ये सखोल संशोधन होत आहेत. स्वतंत्र विचार करू शकणारा नवनिर्मिती करणारा, भविष्यातील आव्हानांना पेलण्याची क्षमता असलेला विद्यार्थी प्रगल्भ व सुसंस्कृत निर्मितीसाठी आवश्यक आहे. ‘शिकण्यासाठी’ सदैव उत्सुक असलेला व त्यातून आनंद घेणारा विद्यार्थी तयार होऊ शकतो. कारण मुळातच शिकणे ही आनंद देणारी गोष्ट आहे. पण अलीकडच्या काळात शिक्षणाची केंद्रे परीक्षा आल्यामुळे शिकवण्याच्या रटारटीमध्ये वाढलेल्या स्पर्धेमध्ये अनैसर्गिक माध्यमाच्या आग्रहामुळे हा आनंद नाहीसा झाल्याचे चित्र दिसत आहे. या सगळ्यातून ही प्रक्रिया आंददायी व्हावी, गुणवत्तापूर्ण व्हावी या हेतूने शिकू आनंदे या प्रकल्पाची सुरुवात करण्याचे लुल्ला फाउंडेशनने ठरवले.

“शिकू आनंदे” या नावाने हा प्रकल्प लुल्ला फाउंडेशनचे चेअरमन श्री. किशोर लुल्ला यांनी हाती घेतला. “तुळजाभवानी शिक्षण मंडळ, इस्लामपूर”, ‘ग्राममंगल ठाणे’, ‘सृजन आनंद कोल्हापूर’ इत्यादी प्रयोगशील शाळांनी प्रस्तावित केलेल्या शास्त्रीय बालशिक्षण पद्धतीचा सखोल अभ्यास केला. मुलांना शिकवू नका, ती शिकुद्यात या तत्वानुसार नवे ज्ञानरचनावादी शिक्षण देण्यासाठी बालक आणि पालक याची तयारी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. केवळ घोकंपट्टीचे शिक्षण यापुढच्या काळात उपयोगी ठरणार नाही, यासाठी सृजनशील शिक्षण मुलांपर्यंत पोचविण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न सुरु केले. श्री तुळजाभवानी शिक्षण मंडळ यांच्या

मार्गदर्शनाखाली सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील बालवाडी शिक्षक, मुख्याध्यापक व संचालक मंडळाचे दिनांक १ मे ते ६ मे रोजी भरीव प्रशिक्षण घेण्यात आले. पालकांच्या जंनजागृतीसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पालक जागरणाचा एक विशेष कार्यक्रम रविवार दिनांक २५ मे २०१४ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला. सांगलीमध्ये शिक्षक पालक स्वयंसेवी संस्था, शिक्षण प्रेमी या सर्वांसाठी चर्चात्म्क स्वरुपात हा कार्यक्रम होता. ‘१०वी फ’, ‘नितळ’, ‘देवराई’ इत्यादी सुप्रसिद्ध चित्रपटाचे निर्माते व दिग्दर्शक सुमित्रा भावे आणि सुनील सुकथनकर यांचे मार्गदर्शन लाभले. ‘ग्राममंगल’ चे संचालक व महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे कार्यध्यक्ष श्री.रमेश पानसे हे अध्यक्षस्थानी होते. तसेच महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे महाव्यवस्थापक श्री.उदय पंचपोर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षणात विविध शैक्षणिक साधने, गटचर्चा, स्वयं अध्यन पद्धती अशा अध्यन - अध्यापन पद्धती यावर चर्चा करण्यात आली.

२०१४ मध्ये लुल्ला फाउंडेशन ने सांगली परिसरातील काही शाळा दत्तक घेतल्या. लहान व मोठ्या गटास शैक्षणिक साहित्य देण्यात आले. यामध्ये अंकजिना, घटनाक्रम, मंचिग सेट, साईड रीडिंग, लेखन पूर्व तयारी, मोजणी, एकास एक संगती, अंक डॉमिनो, वर्गीकरणाचा गुणधर्म, चित्र गप्पा, शेअर रीडिंग असे अनेक साहित्य देण्यात आले. कोणते शैक्षणिक साहित्य कोठे, कशा पद्धतीने वापरायचे याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. वेगवेगळी चित्रफित दाखवून त्याबाबत माहिती देण्यात आली. नवीन शैक्षणिक साहित्य बनवण्यात आले. या शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून आपण मुलांना आनंददायी शिक्षण कशा पद्धतीने द्यायचे याबाबत अनेक अभ्यासवर्ग घेण्यात आले. प्रथम मुलांना कोणकोणत्या संकल्पना स्पष्ट झाल्या पाहिजे यावर विचारविनमय करून त्यांच्यासाठी अभ्यासक्रम ठरविण्यात आला. कोणत्या टप्प्यात काय शिकविले पाहिजे, कोणत्या क्रमाने गेले पाहिजे, त्याच्या जोडीने भावविश्वातील कोणती संकल्पना जोडली पाहिजे, शैक्षणिक साहित्य वापरले पाहिजे याचा सखोल अभ्यास करण्यात आला. प्रथम बालवाड्यासाठी अभ्यासक्रम लागू करण्यात आला. त्या अभ्याक्रमात भाषानुभव, गणितानुभव, कलानुभव, विज्ञान, जीवनानुभव, इंग्रजी, परिसर ज्ञान इत्यादीचा समावेश केला गेला. कारण पाया कच्चा राहिला तर पुढील निव पक्की राहणार नाही. यासाठी बालमानसशास्त्र शास्त्राचा अभ्यास करून बालकेंद्री शिक्षण पद्धती निर्माण करण्यात आली.

शास्त्रीय बालशिक्षण अभ्यासक्रमाचा विचार करून विविध उपक्रम राबवितात येतात. विविध गाणी, गोष्टी, मुक्त खेळ याबरोबर पुस्तके वाचून दाखविली जातात. मुले चित्राच्या आधारे पुस्तक वाचण्याचा प्रयत्न करतात. आपल्या अनुभवाशी जोडून पाहतात. लेखनाचा उपयोग काय हे समजल्यामुले साक्षरतेच्या नव्या जगात आत्मविश्वासाने पाऊल टाकतात. शैक्षणिक साहित्याच्या आधारे गुंतागुतीच्या संकल्पना समजून घेत आहेत. एकास एक संगती, मोजणी, वर्गीकरण, निरीक्षण अशा विविध क्षमता विकसित होतात. विविध प्रकारच्या कला, मातीकाम, प्रकल्प या सर्वांच्या माध्यमातून मुलांच्या वयाला पोषक असे सर्वांगिण अनुभव येथे दिला जातो. गणिताच्या कार्य पुस्तकांच्याद्वारे संकल्पनाचे अधिक दृढिकरण होत आहे.

शाळेमधील सुरु असलेले उपक्रम पालकांना दाखविले जातात. दोन ते तीन महिन्यातून वेगवेगळ्या कार्यक्रमांचे नियोजन केले जाते. ते पाहण्यासाठी पालक वर्गास बोलवले जाते. उदा. गणिती कोपरा असेल तर गणिती संकल्पने संदर्भात शैक्षणिक साहित्य, गणिती खेळ इत्यादीचे आयोजन केले जाते. पालक वर्ग ते खेळ खेळतात, बघतात, त्याबाबत प्रश्न विचारतात आणि त्याचे उत्तरे मुले न घाबरता देत असतात. त्यामुळे पालक सुद्धा खुश होत असतात.

शाळेमध्ये दिवसभराचे नियोजन केले जाते. हवामान तक्ता, आजचा प्राणी/रंग/पक्षी/फळ यापैकी एक, बातमी, दिनदर्शिका, सहभागी वाचन पुस्तकाचे नाव इत्यादी दिवसभराचे नियोजन मुलांसमोर ठेवले जाते. मुलांना सांगितले जाते. त्यानुसार दिवसभर काम केले जाते. यामधून मुलांना शिस्त आणि नियोजनाची सांगड लहानपणापासूनच शिकवली जाते. मुलांना फक्त मुळाक्षरे शिकविली जात नाहीत तर ती एकेरी शब्द वाचतात तसेच त्याचे अर्थ सुद्धा त्यांना कळला आहे याची खात्री केली जाते. बालमानसशास्त्राचा अभ्यास करून, कार्यपुस्तिका त्या विषयातील घटकाच्या संकल्पना अवगत झाल्या की नाही हे पाहण्यासाठी सोडवून घेतल्या जातात. येथील विद्यार्थ्यांचे सर्वकष सातत्यपूर्ण मूल्यमापन दर दोन महिन्यातून होत असते. अभ्यासक्रमावर आधारित मूल्यमापनाचे निकष काढले जातात. निरीक्षणातून त्याचे मूल्यमापन केले जाते. गोंधळ असलेले प्रश्न, न समजलेल्या गोष्टी पुन्हा शिकविल्या जातात आणि परत परत मूल्यमापन केले जाते. गरजेनुसार तज्ञाद्वारे ऑनलाइन सपोर्ट द्वारे वर्गात येणा-या अडचणीबाबत मार्गदर्शन घेतले जाते.

शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींच्या मार्फत शाळेमध्ये चालू असणा-या शिक्षण पद्धतीचे मूल्यमापन करण्यात आले आहे. अनेक तज्ञांनी या शाळेच्या गुणवतीबाबत भरभरून कौतुक केले आहे.

बाळासाहेब लिंबिकाई, अनघा पोंक्षे मिनाक्षी कोळी, मुग्धा अभ्यंकर या प्रकल्पासाठी मार्गदर्शक म्हणून काम करत आहेत. या प्रकल्पातील शाळांचे प्रवेश वाढले आहेत. किंबहुना प्रवेश बंद झाले आहेत असे सांगावे लागत आहेत.

सांगली जिल्ह्यातील नऊ शाळामध्ये हा प्रकल्प राबविला जातो. त्यापैकी सिद्धिविनायक शिक्षण संस्था कुपवाड, अनुराधा किल्लेदार नवजीवन शाळा, कोल्हापूर रोड सांगली, गोविंदराव लिमये शाळा आष्टा, समर्थ बाल मंदिर बेडग, या शाळांना भेट देऊन तिथल्या शिक्षण पद्धतीविषयी, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये घडणार्या अंतरक्रिया आणि नियोजन याबाबत आपले मार्गदर्शन व सूचना अनमोल आहेत याची आम्हाला खात्री आहे. अधिक माहितीकरिता संपर्क मिनाक्षी कोळी 9423067980